महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक संवर्गातील अधिकाऱ्याच्या बदलीबाबत.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
02 FEB 2026
प्राप्त झाले सही...

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन आदेश क्रमांक:-संलेको-२०२५/प्र.क्र.१९५/कोषा. प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०२.०२.२०२६.

**शासन आदेश**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ४ (४) (दोन) व ४ (५) मधील तरतूदीनुसार आणि सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११.०२.२०१५ रोजीच्या परिपत्रकातील तरतूदीनुसार बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाराच्या मान्यतेने महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक संवर्गातील खाली नमूद करण्यात आलेल्या अधिकाऱ्याची प्रशासकीय कारणास्तव स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या पदावर पदस्थापना करण्यात येत आहे:-

| अ.क्र | अधिकाऱ्यांचे नाव | सध्याचे पदनाम व कार्यालय | बदलीनंतरची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १ | श्री. सुहास हिंदुराव पवार | जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, चंद्रपुर | लेखापाल, नगरपरिषद गोंदिया, गोंदिया |

२. श्री. पवार यांनी बदली झालेल्या पदावर तात्काळ रुजू व्हावे. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच, संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे, मुंबई यांना अवगत करावे.

४. श्री. पवार यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तिक माहितीचा तपशील HRMS मधील नमून्यात भरून नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच, संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सहसचिव, मा. मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर. *
३. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
४. संचालक, स्थानिक निधी लेखा परिक्षा, कोकण भवन, नवी मुंबई. *
५. श्री. सुहास हिंदुराव पवार, जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, चंद्रपुर *
६. निवडनस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)

00/29/2026/190
2.2.26